यशोगाथा

## आधुनिक सिंचनतंत्रानं बहरली शेती

# ‘जलवंत’ झालेली माती झाली ‘धनवंती’




कैलास भामरे
(मो.नं. ७४२००१४७८१)
सतीश जाधव
(मो.नं. ९६८९९१५७४५)


### फारसा ‘सरचार्ज’ न लागता पाणी झालं ‘रिचार्ज’ अवर्षणाला कायमचा ‘डिस्चार्ज’



अशी बहरलेली द्राक्षबाग म्हणजे श्री. बापूसाहेब साळुंके यांच्या कल्पक नियोजनाची फलश्रुती...

मूलतः प्रवाही गुणधर्माचे पाणी वेळप्रसंगी दुर्लभही होत असल्याने त्याला अडवणे, योग्य जागी साठवणे आणि हवे तिथे- हवे तितके मुरवणे अत्यंत गरजेचे आहे. समर्थ रामदासांनी यासाठीच ‘उदक चालवावे युक्ती’ असा जलमंत्र सांगितला आहे. वडनेर भैरव (ता. चांदवड, जि. नाशिक) येथील तरुण शेतकरी श्री. बापूसाहेब साळुंके यांनी हा जलमंत्र आत्मसात केला आणि आपल्या शिवाराला समृद्धीचा ओलावा दिला. बव्हंशी द्राक्ष शेतीसह इतरही नगदी पिकांची लागवड करून त्यांनी परिसरात कृषी व्यवस्थापनाचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या यशवंत प्रवासाचा हा सचित्र परिचय...

नाशिक जिल्ह्यातील बहुतांशी दुष्काळग्रस्त गावांमध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवणे ही अगदी नेहमीची बाब आहे. निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत या द्राक्षासाठी संपूर्ण देशात प्रसिद्ध असलेल्या गावापासून जवळ असलेल्या, चांदवड तालुक्यातील वडनेर भैरव या गावातील शेतकऱ्यांनाही काही वर्षांपूर्वी पाण्यासाठी वणवण करावी लागत असे. परंतु या गावातील श्री. बापूसाहेब साळुंके यांनी आपल्या शेतात जलव्यवस्थापनाचे अद्ययावत प्रयोग राबवून स्वत:बरोबरच गावालाही एक दिशा दाखवली. त्यामुळेच आज वडनेर भैरव रसाळ द्राक्षांसाठी प्रसिद्धी पावले आहे.

वडनेर भैरव गावातील सुमारे ८० % लोकांची उपजीविका शेतीवर चालते. जिल्ह्याच्या दुष्काळी परिस्थितीचा इथल्या शेतकऱ्यांवर फारसा दुष्परिणाम झालेला नाही याचे श्रेय निर्यातक्षम द्राक्ष बागायतदार श्री. बापूसाहेब साळुंके यांना जाते. पावसाचे पाणी वाया जाण्यापासून रोखणे, भूगर्भातील पाणी रिचार्ज करणे व कृत्रिम तलावांत त्याचा संचय करणे या त्रिसूत्रीमुळे बापूसाहेब आपल्या शेतात पाण्याची कमतरता निर्माण होऊ देत नाहीत. त्यांनी राबविलेला प्रयोग पाहून त्यांच्या गावातील अन्य शेतकरीही पावसाच्या पाण्याचा थेंब न थेंब वाचविण्यावर भर देत आहेत.

शेती व्यवसायाला सुरुवात केल्यापासूनच बापूसाहेब आपल्या २२ एकर शेतीत पावसाचे पाणी साचवत असून, वर्षाकाठी ते जवळ जवळ २० दशलक्ष लिटर पावसाचे पाणी साचवितात. या पाण्यामुळेच त्यांच्या शेतातील पिके बहरली आणि त्यांना शेतीपासून लाखो रुपयांचे उत्पन्न मिळाले.

## शेती हेच 'करीअर' मानले

१२ वी नंतर त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. मध्येच शिक्षण सोडून शेतीकडे कसे वळालात, असे विचारता ते म्हणाले की, आपले करीअर म्हणूनच मी शेतीकडे पाहिले. कुटुंबाचा मुख्य व्यवसाय शेतीच असल्याने मी लहानपणापासून पिकं, बियाणी आणि माती यांच्यातच रमलो व वाढलो. वडील एकटे शेती सांभाळू शकत नसल्याने २००४ पासून मी व माझा भाऊ मिळून त्यांना शेतीत मदत करण्याचे ठरवले. दुष्काळग्रस्त भागात शेतकरी पाणीटंचाईच्या समस्येचा सामना किती कष्टाने करीत आहेत, हे त्यावेळी प्रथमच माझ्या लक्षात आले.

अत्याधुनिक तंत्राचा वापर करून शेतीतच उज्ज्वल भवितव्य घडवायचे, या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी २००४ मध्ये महाराष्ट्रातील औरंगाबाद येथील प्रख्यात 'जल व भूमी व्यवस्थापन संस्थे'कडून ('वाल्मी') पाच दिवसीय प्रशिक्षण घेतले. या कार्यक्रमात त्यांना रेनवॉटर हार्वेस्टिंग, मायक्रो इरिगेशन आणि जास्त उत्पन्न देणाऱ्या बियाण्यांचे परीक्षण आदी गोष्टी शिकविल्या गेल्या. त्यांना हा प्रशिक्षणाचा उपक्रम खूप भावला. नंतर शेती क्षेत्राचे अधिक ज्ञान मिळविण्यासाठी त्यांनी आणखी प्रशिक्षण घेतले.

या क्षेत्रात मिळविलेल्या यशाचे श्रेय ते त्यांना प्रशिक्षण देणारे 'वाल्मी'तील प्राध्यापक श्री. बी.एम. शेटे यांना देतात. प्रा. शेटे यांनी गेल्या ३५ वर्षांत सुमारे १ लाख शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिल्याचे ते सांगतात. असे लाखो शेतकरी आहेत की ज्यांच्याकडे जमिनीचा तुटवडा नाही परंतु त्यांना अद्यापही





शेतीचा अभ्यास करणारे देशी-विदेशी मान्यवर गावाच्या वेशीत येतात; इथल्या मुशीत घडलेली कृषिक्रांती अनुभवतात...

चांगले उत्पादन मिळण्यात अडचणी आहेत. संस्थेत आम्ही त्यांना त्यांच्याकडे आधीपासून उपलब्ध असलेली साधनसामग्री योग्य पद्धतीने वापरण्यास शिकवितो. श्री. साळुंके यांचे शेत हे त्याचे एक उदाहरण आहे. सूक्ष्मसिंचन करून, ते द्राक्षांचे विपुल व दर्जेदार उत्पादन घेत आहेत, अशी प्रशंसा प्रा. शेटे यांनी यासंदर्भात केली आहे.

### कृषी प्रशिक्षण लावले सत्कारणी

'वाल्मी'तील प्रशिक्षणानंतर श्री. बापूसाहेबांनी अधिक आत्मविश्वासाने शेती करण्यास प्रारंभ केला. २००७ मध्ये त्यांनी एका एकरात सहा लाख रुपये खर्चून पाणलोट तलाव बांधला. तसेच शेतात एक विहीरही खोदली. तलाव २७५ X १५५ फूट असून साठवण क्षमता २० दशलक्ष लिटर आहे. त्यानंतर अर्ध्या एकरात आणखी एक पाणलोट तलाव बांधला, ज्यामध्ये ५० लाख लिटर पाणी गोळा केले जाऊ शकते. सिंचनानंतर पाणी वाहून जाऊ नये म्हणून त्यांनी आपल्या शेताभोवती उंच बांध बनवले आहेत. यामुळे मातीची धूप थांबते, पावसाचे पाणी साचते आणि त्यामुळे भूजल पातळी वाढते. त्यांच्या शेतातील हे बांध इतर शेतकऱ्यांसाठीही उपयोगी ठरत असून आजूबाजूच्या परिसरातील भूजल पातळीतही वाढ होते. आज त्यांच्या शेतात दोन शेततलाव, सात विहिरी व चार बोअरवेल्स आहेत.

वडनेर भैरव परिसरात अनेकदा होणाऱ्या गारपिटीमुळे द्राक्षपीक बऱ्याचदा खराब होत असते. तसेच कधी कधी याउलट स्थिती होऊन कमी पावसामुळेही परिस्थिती बिकट होत असते. जमीन आणि वॉटरशेडच्या विकासाबद्दल श्री.



द्राक्षबागेत आंतरपीक म्हणून घेतलेला हा कांदा 'वांदा' करीत नाही; कारण त्याला लागवडीच्या योग्य व्यवस्थापनाचा आधार लाभलेला आहे...

बापूसाहेबांना प्रारंभी फारशी माहिती नव्हती. या जमिनीत कोणती पिके घेणे योग्य ठरेल, याचीही त्यांना कल्पना नव्हती. परंतु आधुनिक जलव्यवस्थापनाच्या अभ्यासातून त्यांनी याविषयी माहिती घेतली आणि या प्रतिकूल परिस्थितीवर मात केली.



या शेततळ्याची विपुल लांबी, रुंदी आणि खोली म्हणजे 'बापूसाहेब' नावाच्या एकल कृषी विभागाचं जणु 'विस्तारकार्य'च आहे...

### सेंद्रिय निविष्ठा; सूक्ष्मसिंचन तंत्र

त्यांनी शेतीसाठी सूक्ष्म सिंचन प्रणाली तयार केली. यात झाडांच्या मुळांच्या जवळपास ठिबकने पाणी दिले जाते. यामुळे पाण्याचे बाष्पीभवन होत नाही व द्राक्षमण्यांची वाढ चांगली होऊन ते व्यवस्थित पोसले जातात. श्री. बापूसाहेब एकूण शेतीतील बहुतांश क्षेत्रात द्राक्ष पीकच घेतात.




**'सी.आय.आय.' च्या व्यासपीठानंही महाराष्ट्राच्या सुपुत्राची अशी उचित दखल घेतली...**

त्यांच्या शेतात इतर नगदी पिकांचीही लागवड ते करतात. त्यात सिमला मिरची, कांदे, टोमॅटो या पिकांचा समावेश असतो. द्राक्ष लागवडीसाठी त्यांनी अनेक सेंद्रिय पद्धती अवलंबल्या. मल्चिंगसाठी पॉलिथिनऐवजी ऊसाच्या पाचटाने माती झाकण्याचा यशस्वी प्रयोग केला. त्यामुळे ओलावा तर टिकून राहतोच परंतु मातीची गुणवत्ताही वाढते. कालांतराने पाचटाचे खतात रुपांतर होते म्हणून सेंद्रिय खतासाठी हा देखील एक चांगला पर्याय ठरतो. पिकांसाठी ते जास्त करून शेणखताचा वापर करतात, जेणेकरून रासायनिक खतांचा वापर कमीत कमी होतो. पूर्वी त्यांना ३ ते ५ एकर शेतीचे सिंचन करणेही अवघड होते. नवीन तंत्रज्ञानाचा वापर सुरू केल्यामुळे मात्र त्यांना आता त्यांचे संपूर्ण २२ एकर क्षेत्र ओलिताखाली आणता आले. त्यांच्या शेतात द्राक्षांच्या आठ वाणांच्या जवळजवळ २२ हजार वेली आहेत. त्यांचे वार्षिक उत्पादन सरासरी २०० टन आहे.

### भारतात मागणी; विदेशातही द्राक्ष निर्यात

श्री. बापूसाहेबांची उच्च दर्जाची द्राक्षे भारतातील बाजारात विकली जातात. तसेच रशिया, चीन, बांगला देश आणि श्रीलंका या देशांमध्ये निर्यात होतात. प्रत्यक्ष उत्पादकाला द्राक्ष पिकाची योग्य किंमत मिळणे तसे अवघड आहे कारण विक्री प्रणालीमध्ये बरेच मध्यस्थ आहेत, असे त्यांनी सांगितले.

नोकरीच्या मागे न लागता शेतीतच करीअर करण्याच्या निर्णयाचा आज त्यांना आनंद होत आहे. त्यामुळेच त्यांची उत्तम आर्थिक प्रगती झाली. त्यांचे प्रतिएकरी सरासरी उत्पन्न चार लाख रुपयांच्या आसपास जाते. उत्तम शेती करून कुटुंबाची आर्थिक भरभराट केल्याचे त्यांना समाधान आहे. आधुनिक शेतीतंत्राचा अवलंब करून व योग्य ते पूरक प्रशिक्षण घेऊन शेतीतूनसुद्धा कुटुंबाची आर्थिक भरभराट कशी करता येऊ शकते, याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी इतरांना घालून दिला आहे. शेती करायला सुरुवात केली तेव्हा त्यांच्याकडे सायकलशिवाय दुसरे वाहन नव्हते. सायकलवरून सुरू झालेला प्रवास आज स्वत:च्या दोन मोटारी तसंच शेतात राबणाऱ्या माणसांसाठी ७ मोटारसायकलींपर्यंत येऊन पोहोचला आहे. शेती- बाजारपेठेच्या अभ्यासासाठी त्यांनी परदेश वारीही केली आहे.

प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीवर मात करून यशस्वी शेतकरी म्हणून श्री. बापूसाहेब साळुंके यांनी केलेला हा 'कृषी प्रवास' इतर शेतकऱ्यांसाठी खरोखर प्रेरणादायी असाच आहे.

**संपर्कासाठी पत्ता : श्री. बापूसाहेब साळुंके,
मु.पो. वडनेर भैरव, ता. चांदवड,
जि. नाशिक, (मो.नं. ९१३०१६६३५६)**



**निर्यातक्षम कृषिमालाच्या पॅकिंगच्या उत्तम सुविधा असलेलं हे अद्ययावत गोडावून...**